पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/९/कावि/८९५/२००९
दिनांक - ०८.१०.२००९

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक १४.१०.२००९ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा बुधवार, दिनांक १४.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १३६

दिनांक- १४.१०.२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा बुधवार, दिनांक १४.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००८-२००९ मधील अ.क्र.८९ अन्वये, प्राधिकरण प्रभाग क्र.३८ शाहुनगर येथे खेळाच्या मैदानासाठी दुरुस्ती करणेकामी मे.योगेश एन्टरप्रायझेस (नि.र.रू.४,६४,०५२/- [र.रू.चार लाख चौसष्ठ हजार बापन्न] पेक्षा ३४.३०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २) मोशी कचरा डेपोची दि.९/७/०९ रोजी शासनाकडील मान्यताप्राप्त पॉलिटेस्ट लॅबोरेटरीज यांच्यामार्फत करारनामा न करता थेट पद्धतीने तपासणी करुन घेणेकामी झालेल्या र.रु.११,७०६/- खर्चास कार्योत्तर मान्यता तसेच यापुढील कालावधीसाठी शासनमान्य लॅबोरेटरीज मे.पॉलिटेस्ट लॅबोरेटर यांच्यामार्फत तपासणी करुन घेणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३) दवाखाने/रुग्णालयांची सध्याची आवश्यक मागणी लक्षात घेऊन पुढील पुरवठा आदेश द्यावे लागणार असुन STP कडून E-Tendering पद्धतीने औषधे/साहित्य निविदा प्रक्रिया Demo पूर्ण होऊन निविदाधारकांना दर भरणेसाठी १५ ते २१ दिवस मुदत द्यावी लागणार असल्याने STP कडून २९/९/२००९ रोजी Demo होऊन निविदा प्रसिद्धी करणे Finalise झालेस संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑक्टोबर २००९ अखेर पुर्ण होईल तोपर्यंत दवाखाने/ रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या औषधे/साहित्य खेरदीकामी र.रु.१,५०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ४) श्री.भा.स.नेवरेकर,सेवानिवृत्त अधिक्षक अभियंता यांना श्री.व्ही.बी.गायकवाड (सेवानिवृत्त अतिरिक्त शहर अभियंता) व श्री.राजन पाटील (कार्यकारी अभियंता) यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करणेकरीता दिनांक १७/१२/२००५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे विभागीय चौकशी प्रकरणामध्ये ०१ अपचारी गुंतलेला असल्यास र.रु.५०००/- व एकापेक्षा अधिक अपचारी गुंतलेले असल्यास र.रु.८०००/- प्रत्येक प्रकरणासाठी मेहनताना अदा करुन दिनांक २६/०९/२००९ पासून दिनांक १५/१२/२००९ पर्यंत या कालावधीसाठी वाहन व्यवस्थेसह नेमणूक देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ५) डॉ.रन्ना धन्नप्पा यांना लॅप्रोस्कोपी नसबंदी शस्त्रक्रिया या कामकाजासाठी मानसेवी स्त्रिरोगतज्ञ या पदावर आकुर्डी रुग्णालयात दि. २२/०६/२००९ ते २१/१२/२००९ पर्यंत प्रतिमहा र.रु.१०००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ६) सन २००९-१० चे मुळ अंदाजपत्रकातील प्रस्तावात नमुदप्रमाणे अ,ब,क,ड प्रभागातील “कचरा राडारोडा उचलणे व वाहतुक करणे” या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतुदीमधुन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आरोग्य मुख्य कार्यालयाचे “यांत्रिकीद्वारे साफसफाई करणे” व “वाहन निर्वाह” या लेखाशिर्षावर प्रत्येकी र.रु.४०,००,०००/- तसेच क प्रभाग व ड प्रभाग कार्यालयाचे “खाजगीकरणाद्वारे साफसफाईची कामे करणे” या लेखाशिर्षावर प्रत्येकी र.रु.६०,००,०००/- याप्रमाणे एकुण र.रु.२,००,००,०००/- तरतुद वर्ग करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ७) महापालिकेच्या विविध विभागांना आवश्यक असलेले अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रंगीत रुमाल निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पद्धतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे यांचेकडुन प्रति नग दर र.रु.४५/- (जकात,वहातूक इ. कर वगळून) एकूण ७००० नग कापडी रंगीत रुमाल ३६” x ३६” साईजमध्ये नाडीसह, मनपा बोधचिन्ह छपाईसह, खरेदी करण्यास व येणाऱ्या र.रु.३,१५,०००/- अधिक जकात, वहातुक खर्च इत्यादी करासह येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदरची रक्कम मा.प्रशासन

अधिकारी, येरवडा मध्यवर्ती कारागृह,पुणे यांना आगाऊ स्वरुपात अदा करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ८) मे.आर्थोपेडीक इंडस्ट्रीज,पुणे यांचेकडुन कापडी मास्क ९२५० नग खरेदी करणेकामी एकुण र.रु.९९४३७.५० चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ९) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.१०४ अन्वये, प्रभाग क्र.१ व ६ मध्ये पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आर्यन कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६५,६३६/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार सहाशे छत्तीस] पेक्षा २१.९९% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १०) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.१०५ अन्वये, प्रभाग क्र.४ व ५ मध्ये पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आर्यन कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६५,६३६/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार सहाशे छत्तीस] पेक्षा २१.९९% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ११) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.१०७ अन्वये, प्रभाग क्र.२ व ३ मध्ये पाणीपुरवठा विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी मे.आर्यन कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६५,६३६/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार सहाशे छत्तीस] पेक्षा २३.९९% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १२) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.०४/२००८-२००९ मधील अ.क्र.७२ अन्वये, प्राधिकरण प्रभाग क्र.५० मधील से.क्र.२४ मध्ये विविध स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,५९,३८५/- [र.रू.चार लाख एकोणसाठ हजार तिनशे पंच्याऐंशी] पेक्षा ३०.३०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १३) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.०४/२००८-२००९ मधील अ.क्र.७३ अन्वये, प्राधिकरण प्रभाग क्र.५० मधील से.क्र.२७अ मध्ये विविध स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,५८,४५०/- [र.रू.चार लाख अठ्ठावन्न हजार चारशे पन्नास] पेक्षा ३०.३०% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १४) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.०४/२००८-२००९ मधील अ.क्र.७९ अन्वये, काळभोरनगर वॉर्ड क्र.४१ मध्ये सुशोभिकरणाची अंतर्गत स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६५,७८७/- [र.रू.चार लाख पासष्ठ हजार सातशे सत्त्याऐंशी] पेक्षा ३२.३२% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १५) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.०४/२००८-२००९ मधील अ.क्र.४५ अन्वये, आकुर्डी वॉर्ड क्र.५२ विवेकनगर येथे गंगा अपार्टमेंटकडे जाणारा रस्ता हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.एम.एस.पंजाबी (नि.र.रू. ४,६१,३४८/- [र.रू.चार लाख एकसष्ठ हजार तिनशे अठ्ठेचाळीस] पेक्षा १०.००% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक - १६) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.०४/२००८-२००९ मधील अ.क्र.७० अन्वये, प्राधिकरण प्रभाग क्र.४९ मधील से.क्र.२५ मध्ये विविध स्थापत्यविषयक कामे करणेकामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६१,२५२/- [र.रू.चार लाख एकसष्ठ हजार दोनशे बावन्न] पेक्षा २५.९७% कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

**विषय क्रमांक - १७) दिनांक १/१०/२००९ रोजी जागतिक ज्येष्ठ नागरीक दिनानिमित्त आयोजित करणेत आलेल्या कार्यक्रमासाठी आलेल्या र.रु.५७,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.**

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/८९५/२००९
दिनांक : ०८/१०/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.